# पार्श्वनाथ को-ऑप. बँक लि., कोल्हापूर
## बँकेचे आदर्श पोटनियम

१. **नांव** :

बँकेचे नांव "पार्श्वनाथ को-ऑप.बँक लि., कोल्हापूर" असे राहील आणि सदर बँकेची नोंदणी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० नोंदणी क्र. KPR/KVR/BNK (O)122 दि.02/02/1998 अन्वये झाली असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून बँकेस बँकींग व्यवहार करण्याचा परवाना क्र.UBD MAH 1726 P दि.३०/०६/१९९९ नुसार मिळाला आहे.

२. **नोंदणीकृत कार्यालय** :

१. बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय ६६९, ई, शाहुपूरी ३ री गल्ली, कोल्हापूर या पत्त्यावर असेल.

२. बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयाच्या पत्त्यामध्ये बदल करावयाचा झालेस त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची पूर्व परवानगी घेतली जाईल व या बदलाची माहिती स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येईल तसेच हा बदल झालेल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत त्याची दखल नोंदणी अधिकाऱ्याकडे दिली जाईल.

३. **कार्यक्षेत्र** :

बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे व ठाणे जिल्हा या भौगोलीक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. यामध्ये कोणताही बदल करावयाचा झालेस त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नोंदणी अधिकारी यांची लेखी पूर्व परवानगीने कार्यक्षेत्रात वाढ/बदल करणेत येईल.

४. **व्याख्या** :

१. **"कायदा"** कायदा म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.

२. **"नियम"** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.

३. **"निबंधक"** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतूदी नुसार नेमण्यात आलेल्या सहकारी संस्थांचा "निबंधक" ही व्यक्ती होय.

४. **"पोटनियम"** म्हणजे बँकेचे सध्या आस्तित्वात असलेले व कायद्यानुसार नोंदणी कऱ्यात आलेले पोटनियम व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या दुरुस्त्या होय.

५. **"जनरल बॉडी"** म्हणजे मतदानाचा हक्क असलेले बँकेचे सर्व सभासद होय.

६. बोर्ड म्हणजे बँकेचे संचालक मंडळ होय.

७. **"सर्वसाधारण सभा"** म्हणजे मतदानाचा हक्क असलेल्या सर्व सभासदांची सभा. यामध्ये विशेष सर्वसाधारण सभेचाही समावेश होईल.